ePaper

**‘आय लव्ह यू सानिया’, सर्वांसमोर टेनिस स्टारला केला प्रपोज, थेट लग्नासाठीच मागणी...**



वर्ष - 8 । अंक - 210 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 14 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- मी ही जबाबदारी पार पाडली
- शाहीनला ठोठावला दंड!
- मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू!
- दिल्लीपाठोपाठ बिहारही जिंकणार?

### कुदळवाडीतील 850 एकरवरील

# ‘पाडापाडी’साठी एक कोटी रुपयांचा खर्च!

## महापालिका प्रशासनाचा दावा, आतापर्यंत 2 हजार 845 अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

**चिखली, कुदळवाडीतील ८५० एकरवर असलेल्या अनधिकृत गोदामे, पत्राशेड, भंगार दुकानांसह लघु उद्योगांवर सुरू असलेल्या पाडापाडीच्या कारवाईचा खर्च संबंधित जागा मालकांकडून वसूल करण्यात येणार आहे. त्यांच्या सातबारा उताऱ्यावर या खर्चाचा बोजा चढविण्यात येणार आहे. या पाड कामाच्या कारवाईसाठी अंदाजे एक कोटींचा खर्च येण्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.**



अतिक्रमणावर मागील सहा दिवसांपासून सरसकट कारवाई सुरू असून रविवारपर्यंत सुरूच राहणार आहे. आतापर्यंत ४७३ एकर क्षेत्रफळावरील दोन हजार ८४५ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. या कारवाईसाठी ४६ पोकलेन, आठ जेसीबी, एक क्रेन, चार कटर या यंत्रसामग्रीसह पोलीस, इतर मनुष्यबळ, जेवण, साहित्य यावर अंदाजे एक कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. हा खर्च जागा मालकांकडून वसूल करण्यात येणार आहे. अनधिकृत भंगार गोदामे, पत्राशेड यामुळे या परिसराला बकालपणा आला होता. सातत्याने आगीच्या घटना घडत होत्या. यातून मोठ्या प्रमाणात वायुप्रदूषण होत होते.

महापालिकेने अनधिकृत व्यावसायिकांचे सर्वेक्षण केले. यामध्ये अनेक व्यावसायिकांनी अग्निशमन दाखला, उद्योग धंदा परवाना, प्रदूषण नियंत्रण महामंडळाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. त्यानंतर कारवाईची मोहीम हाती घेतली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले, ‘शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मूलभूत सुविधा पुरविताना ताण येत आहे. वाकड भागातील दत्त मंदिर परिसरातही अतिक्रमणाची मोठी कारवाई करण्यात आली. कुदळवाडीतील कारवाईसाठी कोणताही राजकीय दबाव नाही. सरसकट कारवाई केली जात आहे. उद्योजकांच्या कोणत्याही यंत्रसामग्रीला इजा पोहोचू दिली नाही. साहित्य काढण्यासाठी व्यावसायिकांना पुरेसा वेळ देण्यात आला होता.

### बोजा चढविण्याची प्रक्रिया

अतिक्रमण कारवाईच्या खर्चाची जागेच्या क्षेत्रफळानुसार विभागणी केली जाणार आहे. खर्च, जागेचा सर्व्हे नंबर, मालमत्ता क्रमांकासह महापालिका तहसीलदार किंवा तलाठ्यांना पत्र देणार आहे. त्यानंतर संबंधित जागा मालकांच्या सातबारा उताऱ्यावर बोजा चढविण्यात येणार आहे. भविष्यात जागा मालकांना कोणताही व्यवहार करण्यापूर्वी हे पैसे महापालिकेकडे जमा केल्याशिवाय व्यवहार करता येणार नाही.

पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांच्या निळ्या पूररेषेतील बांधकामेही पाडण्यात येणार आहेत. तळवडे, काळेवाडी, थेरगाव, पिंपरी, वाल्हेकरवाडीतही कारवाई केली जाणार आहे. भंगार दुकाने शहराबाहेर काढण्यात येणार आहेत, असे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### पुन्हा अतिक्रमण झाल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई

कुदळवाडी परिसरात पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी बीट निरीक्षक, क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे पथक नेमले जाणार आहे. हे पथक परिसरात गस्त घालणार आहे. त्यामुळे अतिक्रमण होणार नाही. त्यानंतरही अतिक्रमण झाल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

### साहित्य न उचलल्यास जागा मालकांना नोटीस

पाडकामाची कार्यवाही केल्यानंतर जागा मालकांनी पत्राशेडसह त्यांचे सर्व साहित्य दुसरीकडे उचलून घेऊन जावे. साहित्य जागेवर ठेवल्यास आगीची घटना घडू शकते. साहित्य न हटविल्यास जागा मालकांना नोटीस देण्यात येणार आहे.

---

# पुणे महानगरपालिकेचा मोठा निर्णय

## ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करण्यावर बंदी

**। पुणे । महाईन्यूज**

**पर्यावरण वने व वातावरणीय बदल विभागाकडून यापूर्वीच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालण्यात आली आहे. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**



पुणे महानगरपालिकेने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेने पुण्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करण्यावर बंदी घातली आहे. गणपती किंवा इतर कोणत्याही सणांच्या पार्श्वभूमीवर पीओपीच्या मूर्ती बनवल्यास कारवाई करण्यात येणार आहे. पुणे महापालिकेने यासंदर्भात आदेश काढले आहे.

पुणे मनपाचा काय आहे आदेश

केंद्रीय पर्यावरण वने व वातावरणीय बदल विभागाकडून यापूर्वीच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालण्यात आली आहे. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती करण्याऐवजी नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक जैविक घटक पदार्थांपासून तयार करण्यात आलेल्या मूर्ती तयार कराव्या, असे पुणे महानगरपालिकेने म्हटले आहे. तसेच सर्व मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच / रहिवासी संकुलातील टाकीमध्ये अथवा मूर्ती स्वीकृती केंद्रामध्ये करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### ठाण्यात यापूर्वी बंदी

पुणे मनपापूर्वी ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहरात प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तींच्या विक्रीवर बंदी घातली होती. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पर्यावरण (संरक्षण) कायद्याअंतर्गत कारवाई करण्याचा इशारा दिला होता. माघी गणपतीमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती असणाऱ्या मंडळांना मुंबई मनपाने नोटीस दिल्या होत्या. त्यासंदर्भातील मुद्दा शिवसेना उबाठा पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला होता.

# कोंडीमुक्त पुण्यासाठी सुविधांचा वेग वाढवा!

## सुरळीत वाहतुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवारांची सूचना

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर आणि उपनगरातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली असून ती सोडविण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी मेट्रो, उड्डाणपूल, वर्तुळाकार रस्ता तसेच अन्य पायाभूत सुविधांच्या कामांचा वेग वाढविण्यात यावा, अशी सूचना उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिली.**



जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'कर्जत-भीमाशंकर-खेड-शिरूर' रस्त्याच्या कामाची व्यवहार्यता तपासावी, असे आदेशही पवार यांनी दिले.उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची (प्रोजेक्ट मॉनिटरिंग युनिट) बैठक गुरुवारी मंत्रालयात झाली. नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसेक यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागच्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते. तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, महामेट्रोचे व्यवस्थापकीयसंचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंग, पीएमआरडीएचे महागनर आयुक्त डॉ. योगेश म्हसे उपस्थित होते.'प्रकल्पाला विलंब लागत असल्यामुळे त्यांच्या किमतीमध्ये मोठी वाढ होत असून, राज्याचे आर्थिक नुकसान होत आहे. ते टाळण्यासाठी विकास प्रकल्प नियोजित वेळेतच पूर्ण करावेत. शहरातील वाहूतक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे शहर आणि उपनगरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वर्तुळाकार मार्गाचे काम वेळेत पूर्ण करावे लागेल,' असेही पवार यांनी सांगितले.

लोणावळा येथील नियोजित स्काय वॉक, टायगर पॉइंट, पुणे-नाशिक ग्रीन फिल्ड सेमी हायस्पीड रेल्वे, शहरातील वस्ताद लहुजी साळवे स्मारकाच्या कामांचाही पवार यांनी आढावा घेऊन सूचना केली.तील दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'कर्जत-भीमाशंकर-खेड-शिरूर' रस्त्याच्या कामाची व्यवहार्यता तपासावी, असे आदेशही पवार यांनी दिले.उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची (प्रोजेक्ट मॉनिटरिंग युनिट) बैठक गुरुवारी मंत्रालयात झाली.

### वर्तुळाकार मार्गाचे काम पूर्ण करावे

नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसेक यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागच्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थित होते. तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, महामेट्रोचे व्यवस्थापकीयसंचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंग, पीएमआरडीएचे महागनर आयुक्त डॉ. योगेश म्हसे उपस्थित होते.'प्रकल्पाला विलंब लागत असल्यामुळे त्यांच्या किमतीमध्ये मोठी वाढ होत असून, राज्याचे आर्थिक नुकसान होत आहे. ते टाळण्यासाठी विकास प्रकल्प नियोजित वेळेतच पूर्ण करावेत. शहरातील वाहूतक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे शहर आणि उपनगरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वर्तुळाकार मार्गाचे काम वेळेत पूर्ण करावे लागेल,' असेही पवार यांनी सांगितले.

---

# बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवास सेवा

## आ. शेळके यांच्या पुढाकाराने 2500 विद्यार्थ्यांना सुविधा

। मावळ ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**मावळ तालुक्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत आणि विनासायास पोहोचता यावे, यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने 'मावळ डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या वतीने मोफत वाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. हा उपक्रम सन २०१६-१७ पासून सुरू असून यंदा नवव्या वर्षात पदार्पण करत आहे. यंदाच्या परीक्षेसाठी २,५०० हून अधिक विद्यार्थ्यांना या सेवेचा लाभ मिळणार आहे.**



मावळ तालुक्यातील आंदर मावळ, पवन मावळ आणि नाणे मावळ या भागातील तळेगाव दाभाडे, लोणावळा, पवनानगर, कामशेत, वडगाव, कान्हे, कार्ला, शिवणे, उर्से, थोरण, डोणे, जांबवली, कांब्रे, चिखलसे, निगडे, आंबळे, खांडी आदी ४६ गावांमधील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्रावर जाण्या-येण्यासाठी मोफत प्रवास व्यवस्था करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला मावळ तालुक्यातील पाच परीक्षा केंद्रांवर एकूण ४,५८२ विद्यार्थी बसणार आहेत.

या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहतूक सेवा उपयुक्त ठरणार आहे. मावळ तालुक्यातील अनेक विद्यार्थी दुर्गम भागातून येतात. परीक्षेच्या काळात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बससेवा मर्यादित असल्याने तसेच अवैध प्रवासी वाहतुकीच्या समस्येमुळे विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रांवर पोहोचणे कठीण होते. ही गरज लक्षात घेऊन आमदार सुनील शेळके यांनी पुढाकार घेतला आणि 'घर ते परीक्षा केंद्र' मोफत प्रवास सेवा सुरू केली.

### विद्यार्थ्यांसाठी मोलाची सोय

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचता येईल आणि परीक्षा संपल्यानंतर घरी परतणे सोयीचे होईल. गेल्या नऊ वर्षांपासून चालू असलेल्या या सेवेमुळे पालक आणि विद्यार्थी समाधान व्यक्त करत आहेत. या उपक्रमामुळे तालुक्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळत आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोफत सेवा उपयुक्त ठरणार असून, या उपक्रमामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना मानसिक शांती मिळेल आणि परीक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

> "विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी शिक्षणासोबतच त्यांना आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे. ही मोफत वाहतूक सेवा विद्यार्थ्यांच्या हितासाठी सुरू केली असून, भविष्यातही ती सुरू राहील."
>
> – आमदार सुनील शेळके

# ‘पीएमपीएमएल’च्या प्रवाशांना “व्हॅलेंटाईन गिफ्ट”!

## बसची संख्या वाढणार : पुणे व पिंपरी चिंचवडसाठी मिळणार एक हजार बस

। पिंपरी-चिंचवड।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी एक हजार बस पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएल) ताफ्यात येणार आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन (पीएमआरडीए) ५०० बस घेण्याचा निर्णय बुधवारी घेण्यात आला. तर पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिका मिळुन 500 बस उपलब्ध करून देणार आहेत.**



पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएल) ताफ्यात असलेल्या अपुऱ्या बस संख्येमुळे सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर एकीकडे ताण वाढत आहे. तर, खासगी वाहनांच्या वाढत्या वापरामुळे शहरात वाहतुक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

या पार्श्वभुमीवर, राज्य सरकारकडुन पुणे व पिंपरी चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुक व्यवस्था सक्षम करण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. पालकमंत्री अजित पवार व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही ‘पीएमपीएल’साठी नवीन बस खरेदी करण्याबाबत सुतोवाच केले होते. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मुंबईमध्ये बैठक झाली. या बैठकीस पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी उपस्थित होते. या बैठकीमध्ये बस घेण्यास मान्यता देण्यात आली.

या बैठकीमध्ये पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही शहरांसाठी सीएनजीवरील एक हजार बस घेण्यात येणार आहेत.

त्यापैकी “पीएमआरडीए’ ५०० बस पीएमपीएलला देण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान, पीएमआरडीएच्या अंदाजपत्रकामध्ये त्यासाठी तरतुद करण्यात आली आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या घेतलेल्या बैठकीत पुणे महापालिका व पिंपरी चिंचवड महापालिकेने ५०० बस उपलब्ध करुन देण्यास सांगितले होते. पुणे महापालिकेकडुन खरेदी केल्या जाणाऱ्या बससाठी ४० ते ४५ कोटी रुपयांची आवश्यकता लागणार आहे.

सध्या पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही शहरांमधील प्रवाशांची संख्या लक्षात घेता, ६००० बसची गरज आहे, प्रत्यक्षात रस्त्यावर १६५० बस धावतात. आयुर्मान संपल्यामुळे ३०० बस कमी होणार आहे. त्यामुळे बस खरेदीच्या मान्यतेमुळे पीएमपीएलला उर्जितावस्था येण्याची शक्यता आहे.

### दीड वर्षांपासून बस खरेदीची फक्त चर्चाच

मागील दिड वर्षांपासुन पीएमपीसाठी बस खरेदी करण्याबाबत चर्चा सुरु आहे. तत्कालीन आयुक्त विक्रम कुमार यांनी बस खरेदीची घोषणा केली होती. त्यानंतरच्या प्रक्रियेत काही माननीयांनी हस्तक्षेप केला, तर पुढे निवडणुकांमुळे ही प्रक्रिया आणखीनच पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे आता तरी बस खरेदीची चर्चा थांबुन बस खरेदीची प्रक्रिया पुर्ण होणार का? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश...

‘मुंबईमध्ये बुधवारी झालेल्या बैठकीत पीएमआरडीएकडुन पाचशे बस पीएमपीएलला द्याव्यात, असा निर्णय घेण्यात आला. तर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका यांनी पाचशे बसेस द्यावेत असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार एक हजार बस घेतल्या जाणार आहेत.’

-पृथ्वीराज बी.पी, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

---

# आ. अमित गोरखे यांनी प्रलंबित प्रश्नांचा घेतला आढावा

## भोसरी,चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला बजेटमध्ये निधी देण्याची माजी नगरसेवकांनी केली मागणी

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेशी सबंधित पिंपरी विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांचा आढावा आमदार अमित गोरखे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडून गुरुवारी (ता.१३) घेतला. महापालिका अधिकारी आणि पिंपरी मतदारसंघातील भाजपचे माजी नगरसेवक या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी माजी नगरसेवकांनी भोसरी, चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला महापालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात निधी देण्याची मागणी केली.विधान परिषदेवर निवडून गेल्यानंतर आ.गोरखे यांनी पिंपरीची अशी ही पहिलीच बैठक घेतली..**




महापालिका निवडणूक झाली नसल्याने गेले ३५ महिने महापालिकेत प्रशासक राज आहे. त्यामुळे नागरी प्रश्न तातडीने सुटत नसून विकासकामेही प्रलंबित आहे. त्यासाठी आ.गोरखेंनी ही बैठक घेतली.शहरातील दुसऱ्या विधान परिषद सदस्य उमा खापरे या परदेशात असल्याने या बैठकीला उपस्थित राहू शकल्या नाहीत. तिचे वैशिष्ट म्हणजे वॉर्ड तथा प्रभागनिहाय प्रलंबित समस्या त्यात मांडण्यात आल्या.त्यातील शक्य त्या लगेच सोडवतो असे आश्वासन आयुक्तांनी दिले.माजी नगरसेवक शीतल शिंदे,राजेश पिल्ले,राजू दुर्गे,संदीप वाघेरे,चेतन घुले,शैलेश मोरे,अनुराधा गोरखे,सुजाता पलांडे,शर्मिला बाबर,कुणाल लांडगे, कैलास कुटे,गणेश लंगोटे,आर. एस.कुमार,राजेंद्र बाबर,प्रदीप भोसले आदी यावेळी उपस्थित होते.या सर्वांनी भोसरी,चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला बजेटमध्ये निधी देण्याची एकमुखी मागणी केली. ज्येष्ठ माजी नगरसेवक आर.एस. कुमार यांनी निगडी-प्राधिकरणात भेडसावणाऱ्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाकडे यावेळी लक्ष वेधले,प्राधिकरणातील वाहतूक कोंडीचाही मुद्दा मांडला. उद्यानांची देखभाल होत नसल्याचे सांगत महापालिकेची क्षेत्रीय कार्यालय इमारत अपुरी पडते आहे,असे बाबर म्हणाले. वाघेरे यांनी बजेटमध्ये आपल्या प्रभागासह पिंपरी गावासाठी निधी देण्याची मागणी केली.पिंपरी कॅम्प या शहराच्या बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना वाहतुकीची मोठी समस्या भेडसावत असल्याचे त्यांनी सांगितले. झोपडपट्टी पुनर्वसनाचे (एसआरए) काम नीट होत नसल्याकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.श्रीमती गोरखे यांनी शाहूनगर येथे पडून असलेल्या अडीच एकरच्या भुखंडावर नाट्यगृह उभारण्याची मागणी केली.त्यांनी सुद्धा वाहतूक कोंडीचा प्रश्न उपस्थित केला.संत तुकारामनगर येथे सुरु असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीच्या कामाला वेग द्या,असे पालांडे म्हणाल्या. वल्लभनगर एसटी आगाराशेजारचा मोकळा भुखंड विकसित करा,अशी सूचना त्यांनी केली.

### विकासकामांचा आढावा घेणार नियमितपणे

अनधिकृत पार्किंगच्या मोठ्या समस्येकडे शिंदे यांनी लक्ष वेधले. त्यामुळे तसेच बीआरटीमुळे रस्ता अरुंद झाल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे सांगितले. पादचाऱ्यांची सुद्धा रस्ता अरुंद झाल्याने गैरसोय होत आहे, असे ते म्हणाले. अनधिकृत पार्क केलेल्या वाहनांच्या गराड्यातून पादचाऱ्यांना मार्ग काढावा लागतो, जीव धोक्यात घालून रस्त्यातून चालावे लागते, असे ते म्हणाले. येत्या काही दिवसांत सादर होणाऱ्या महापालिका बजेटमध्ये आपला प्रभागच नाही,तर आपल्या पिंपरी मतदारसंघालाही भरीव निधी देण्याची मागणी केली. पिंपरीतील प्रलंबित प्रश्न तथा विकासकामांचा आढावा नियमितपणे घेतला जाणार असल्याचे आ. गोरखे यांनी या बैठकीनंतर सांगितले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने

### नामाचे त्रिकालाबाधित श्रेष्ठत्व!



नाम हे सच्चिदानंद-स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते. अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वत: मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे ! खरोखर, तुम्हाला मी काय सांगू ! बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात 'मी'पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरुष नामाविषयी मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही. नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते.

नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे. कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे. नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दु:खे नाहीशी होतात, कारण या दु:खांचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दु:ख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दु:ख त्या ठिकाणी कसे राहू शकेल ?

**बोधवचन:- प्रत्येक मनुष्याने भगवंताचे नाम घ्यावे, त्याचे ध्यान करावे, त्याच्या स्मरणात राहावे, आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घ्यावे.**

# देवा-राज भेटी मागं नेमकं दडलंय काय?



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**दोन दिवसांपूर्वी सकाळी सकाळी बातमी येऊन धडकली, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे 'मनसे' चे नेते राज ठाकरे यांच्या घरी चक्क नाश्त्याला पोहोचले. घरोघरी अजून नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे नाश्ते झाले नव्हते, त्यावेळी देवाभाऊ आणि राजसाहेब एकत्र नाश्ता घेत होते, गप्पा मारत होते, भविष्यातील राजकारणाचा वेध घेत असावेत !**



**'महायुती' मधील धुसफूस महत्वाची.**

या महत्वपूर्ण भेटीबदल राजकीय वाद, तर्कवितर्क लढवले जात असतानाच 'उबाठा' गटाचे तीन नेते त्याच दिवशी सायंकाळी मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले. विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळूनही 'महायुती' त मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली धुसफूस, हे या गाठीभेटींचे कारण तर नाही ना अशी एक नवीनच चर्चा सुरू झाली. ठिकठिकाणच्या पालकमंत्रिपदावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्यात मतभेद असल्याचं सांगितलं जात आहे. 'महायुती' त सुरू असलेल्या या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी दोन बैठका घेतल्या आहेत, या मागचा अर्थ काय तो ओळखा!

**भाजपच्या मनात काय ?**

महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष म्हणून स्वतःला स्थापित कराण्यासाठी भाजपाचे प्रयत्न सुरू आहेत, त्यांच्या नेत्यांच्या मनात काय हे ओळखण्याची आता गरज आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महानगरपालिका भाजपासाठी अत्यंत महत्वाची आहे. या निवडणुकीच्या संदर्भातही फडणवीस यांच्या हालचालींकडे पाहिले जात आहे. गेल्या अनेक दशकांपासून मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेची सत्ता आहे. मात्र, एकसंध शिवसेनेत फूट पडल्यानंतर यंदाच्या निवडणुकीत मुंबईवर आपल्याच पक्षाचा झेंडा फडकणार, अशी भाजपा नेत्यांना आशा आहे, तशी त्यांची तीव्र इच्छाही आहे.

येत्या काही महिन्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आम्ही स्वतंत्रपणे लढवणार आहोत, असं महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी आधीच सूचित केलं आहे. तर दुसरीकडे फडणवीस यांच्या जवळच्या सुत्रानी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांना मित्रपक्ष म्हणून मुंबई महानगरपालिकेची निवडणूक एकत्र लाढण्याचा संदेश दिला आहे. शिवसेनेने नकार दिला, तर भाजपासमोर पर्याय उपलब्ध असल्याचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, हे पण भेटीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आहे.

**राजकीय चर्चा नव्हती..**

दरम्यान, फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, असे भाजपा नेत्याने सांगितले. विधानसभा निवडणुकीत प्रचंड पश मिळाल्यानंतर राज ठाकरे यांनी फडणवीसांचे फोनवरून अभिनंदन केले होते. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी त्यांना भेटीचे आश्वासन दिले होते, असेही भाजप नेत्याने स्पष्ट केले आहे. मात्र, असं असलं तरी काही दिवसांपूर्वी राज ठाकरे यांनी एका जाहीर सभेत भाजपाच्या प्रचंड विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं, हे सुद्धा अगदी ताजं उदाहरण आहे.

**मुद्दा अमित यांच्या आमदारकीचा**

राज यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांचा माहीम मतदारसंघात पराभव झाला आहे. राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये भाजप कोट्यात काही जागा आहेत. अमित यांना राज्यपाल नामनियुक्त आमदार माणून विधानपरिषदेवर पाठवण्याची शक्यता आहे, याची चर्चा होत आहे.

**ठाकरे गटाच्या नेत्यांची भेट..**

राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर ठाकरे गटाचे तीन नेते मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी 'सागर' बंगल्यावर दाखल झाले होते. यामध्ये मिलिंद नार्वेकर, सुभाष देसाई आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा समावेश होता. दिवंगत नेते बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी ही भेट होती, असं या नेत्यांकडून सांगण्यात आलं. दुसरीकडे उद्योगमंत्री उदय सामंत हे गेल्या काही दिवसांपासून उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांवर नाराज असल्याची चर्चा होती. त्यांचे एक पत्र सार्वजनिक झाल्यानंतर काही तासांतच मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी एक बैठक झाली, यामध्ये त्यांच्या विभागाच्या अधिकाऱ्यांना सामंत यांच्या माहितीशिवाय निर्णय घेऊ नका, असे निर्देश दिले होते, यावर चर्चा झाली नसेल ना ?

**खरोखर नाष्टा का बंद दार आणि चर्चा**

देवेंद्रजी आणि राज साहेब यांच्या भेटीच्या वेळी नाश्ता हेच खरोखर कारण होते का आणखी काही मुद्दे होते, त्या भेटी मागे नेमकं दडलंय काय, याची चर्चा मात्र अनेकांना भेडसावत आहे. मुंबई महानगरपालिकेची आगामी निवडणूक, अमित ठाकरे यांची आमदारपदी वर्णी, निवडून आल्यानंतर नाश्त्याला येण्याचे आश्वासन या तीन मुद्द्यांभोवती चर्चा फिरत आहे. देवेंद्र फडणवीस हे राजकारणाच्या सारीपाटावरील चाणक्य मानले जात आहेत. सर्वसामान्याला या तीन मुद्द्यांभोवती फिरत ठेवून चौथीच खेळी करायची, हे तर त्यांच्या मनात नाही ना ? पाहू या.. राजकारण रोजच उलट सुलट पद्धतीने कोलांटउड्या घेत आहेत, फडणवीस यांच्या डावामुळे कोणावर उड्या मारण्याची वेळ येते, ते लवकरच समजेल!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# काँग्रेसची पुढील वाटचाल कशी असेल?

## प्रदेशाध्यक्षपदी निवड झालेल्या सपकाळ यांनी केलं स्पष्ट

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची कामगिरी ही अत्यंत निराशाजनक झाली होती. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या जागी नवा प्रदेशाध्यक्ष निवडण्यात येणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. अखेर आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केली आहे. याचबरोबर मल्लिकार्जुन खरगे यांनी विजय वडेट्टीवार यांची महाराष्ट्र काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यासही मान्यता दिली आहे.**



काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी वर्णी लागल्यानंतर सकपाळ यांनी त्यांची काँग्रेस पक्षाच्या भविष्यासाठीची योजना काय असतील यावर भाष्य केले आहे. याबरोबरच त्यांनी हे पद मिळणे आपला सन्मान असल्याची भावना व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, “बुथवर चिठ्ठ्या वाटणारा एक कार्यकर्ता पुढे जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो, आमदार होतो. राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळते आणि आता प्रदेशाध्यक्ष पदासारखा सन्मान केला जात असेल तर हा भारावून जाण्यासारखा क्षण आहे. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही, अत्यंत सामान्य परिवारातील कार्यकर्त्याला हा सन्मान दिला जात असेल तर हे माझं सौभाग्य आहे”.काँग्रेसची पुढील वाटचाल कशी असेल? या प्रश्नला उत्तर देताना सकपाळ म्हणाले की, “काँग्रेसचा वैचारिक आणि संघटनात्मक विस्तार करण्याची आवश्यकता आहे, तो माझा प्रयत्न असेल. महाराष्ट्रातील सद्भावना कमी झाली आहे, जाती एकमेकांशी लढत आहेत. प्रत्येक जात वेगळ्या पद्धतीने चालण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आज पुरोगामी महाराष्ट्राची जी ओळख आहे की, आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करावं आणि महाराष्ट्र धर्म जागवावा, एकत्रित सर्वांनी पुढे जावं या सद्भावाचा अभाव सध्या आपल्याला बघावा लागतोय. ही सद्भावना घेऊन पुढे जाण्याचा माझा प्रयत्न असेल,” असे\ हर्षवर्धन सकपाळ म्हणाले. ते टीव्ही९शी बोलत होते.अखिल भारतीय काँग्रेस समितीने आज एक पत्रक जारी करत सकपाळ यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केले आहे. या पत्रकात म्हटले आहे की, “काँग्रेस अध्यक्षांनी हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी तात्काळ प्रभावाने नियुक्ती केली आहे. मावळते अध्यक्ष नाना पटोले यांच्या योगदानाचे पक्ष कौतुक करतो. याचबरोबर काँग्रेस अध्यक्षांनी महाराष्ट्रातील काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून विजय नामदेवराव वडेट्टीवार यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने करण्यास मान्यता दिली आहे.”दरम्यान काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी वर्णी लागल्यानंतर सकपाळ यांनी त्यांची काँग्रेस पक्षाच्या भविष्यासाठीची योजना काय असतील यावर भाष्य केले आहे. याबरोबरच त्यांनी हे पद मिळणे आपला सन्मान असल्याची भावना व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, “बुथवर चिठ्ठ्या वाटणारा एक कार्यकर्ता पुढे जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो, आमदार होतो. राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळते आणि आता प्रदेशाध्यक्ष पदासारखा सन्मान केला जात असेल तर हा भारावून जाण्यासारखा क्षण आहे. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही.

### एकत्रित सर्वांनी पुढे जावं

अत्यंत सामान्य परिवारातील कार्यकर्त्याला हा सन्मान दिला जात असेल तर हे माझं सौभाग्य आहे”.काँग्रेसची पुढील वाटचाल कशी असेल? या प्रश्नला उत्तर देताना सकपाळ म्हणाले की, “काँग्रेसचा वैचारिक आणि संघटनात्मक विस्तार करण्याची आवश्यकता आहे, तो माझा प्रयत्न असेल. महाराष्ट्रातील सद्भावना कमी झाली आहे, जाती एकमेकांशी लढत आहेत. प्रत्येक जात वेगळ्या पद्धतीने चालण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आज पुरोगामी महाराष्ट्राची जी ओळख आहे की, आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करावं आणि महाराष्ट्र धर्म जागवावा, एकत्रित सर्वांनी पुढे जावं या सद्भावाचा अभाव सध्या आपल्याला बघावा लागतोय. ही सद्भावना घेऊन पुढे जाण्याचा माझा प्रयत्न असेल.

# आरोग्य विभागात साडेसोळा लाखांचा अपहार

## अहिल्यानगर पालिकेच्या दोघा अधिकाऱ्यांची पोलीस कोठडीत रवानगी

। अहिल्यानगर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महापालिकेच्या आरोग्य विभागात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील १६ लाख ५० हजार रुपयांच्या अपहारप्रकरणी अटक केलेल्या वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. अनिल बोरगे व राष्ट्रीय आरोग्य अभियानचा शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे या दोघांना आज, गुरुवारी न्यायालयाने सोमवारपर्यंत (दि. १७) पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.**



आरोग्य विभागाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हा गुन्हा कोतवाली पोलिसांनी काल, बुधवारी दाखल केला व रात्री डॉ. बोरगे व विजयकुमार रणदिवे या दोघांना अटक केली. अटकेनंतर डॉ. बोरगेने पोलिस ठाण्यातून पलायनाचा प्रयत्न केला.

मात्र पोलिसांनी तातडीने त्यांना ताब्यात घेतले.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी आरोग्य विभागाच्या सर्वच कामकाजाच्या तपासणीचे आदेश दिले होते. तत्पूर्वी डॉ. अनिल बोरगे यांना निलंबित करण्यात आले होते. तिघा अधिकाऱ्यांच्या समितीने आरोग्य विभागाच्या कामकाजाची तपासणी करून आयुक्तांना अहवाल सादर केला. या अहवालानुसार शासकीय अभियानाच्या खात्यातून १५ लाख व नंतर १६ लाख ५० हजार रुपये रणदिवेच्या खात्यात वर्ग झालेले आढळले.

१५ लाख रुपये टप्प्याटप्प्याने पुन्हा अभियानाच्या खात्यात वर्ग करण्यात आले. मात्र १६ लाख ५० हजार रुपये अद्यापि शासकीय खात्यात जमा झाले नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. डॉ. राजूरकर यांनी अपहाराची फिर्याद पोलिसांकडे दिली. तपासी अधिकारी तथा कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे व सरकारी वकील अमित यादव यांनी न्यायालयात बाजू मांडताना सांगितले की, रणदिवेने डॉ. बोरगे यांच्याशी संगमनेत करून १६ लाख ५० हजार रुपये स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यात घेतले. अधिकाराचा गैरवापर करून अशा प्रकारचे इतर गुन्हे केले आहेत का, याचा तपास करायचा असल्याने चार दिवस पोलीस कोठडी द्यावी.

### पोलिस ठाण्यातून पलायनाचा प्रयत्न

महापालिकेच्या आरोग्य विभागात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील १६ लाख ५० हजार रुपयांच्या अपहारप्रकरणी अटक केलेल्या वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. अनिल बोरगे व राष्ट्रीय आरोग्य अभियानचा शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे या दोघांना आज, गुरुवारी न्यायालयाने सोमवारपर्यंत (दि. १७) पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. आरोग्य विभागाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हा गुन्हा कोतवाली पोलिसांनी काल, बुधवारी दाखल केला व रात्री डॉ. बोरगे व विजयकुमार रणदिवे या दोघांना अटक केली. अटकेनंतर डॉ. बोरगेने पोलिस ठाण्यातून पलायनाचा प्रयत्न केला.

# मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू!



## दोन वर्षांपासून सुरू असलेल्या हिंसाचारात 300 हून अधिकांचा मृत्यू

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गृहमंत्रालयाने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केल्याचे जाहीर केले आहे. गेल्या काही दिवसांपासून मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणात जातीय हिंसाचार झाला आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिल्याच्या काही दिवसातच राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

सिंग यांनी मणिपूरमध्ये तब्बल २१ महिने जातीय हिंसाचार सुरू राहिल्यानंतर राजीनामा दिली होता. मणिपूरमधील हिंसाचारात जवळपास ३०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक विस्थापित देखील झाले आहेत. मणिपूरमध्ये मे २०२३ पासून मेतेई आणि कुकी-झो समुदायांमध्ये जातीय संघर्ष सुरू आहे. मणिपूरमध्ये यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) नेतृत्वाखालील सरकार होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये, कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) ने एन. बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर ९ फेब्रुवारी रोजी सिंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.भाजपाने बिरेन सिंग यांच्यानंतर मुख्यमंत्री पदाच्या दावेदारासाठी मतैक्य तयार करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र भाजपा नेतृत्वाला यामध्ये यश आले नाही. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी काँग्रेस आणि इतर राजकीय विरोधकांकडून सातत्याने केली जात होती.रविवारी (९ फेब्रुवारी ) बिरेन सिंह यांनी मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. त्यानंतर राज्यपालांनी सिंह यांचा राजीनामा स्वीकारला देखील. राजीनाम्याच्या पत्रात सिंह यांनी लिहिले की, "आतापर्यंत मणिपूरच्या लोकांची सेवा करणे ही सन्मानाची गोष्ट राहिली आहे. प्रत्येक मणिपुरीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वेळोवेळी केलेल्या कृती, हस्तक्षेप, विकासात्मक कार्ये आणि विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मी केंद्र सरकारचा अत्यंत आभारी आहे." त्यांनी पुढे म्हटले, "केंद्र सरकारला माझी प्रामाणिक विनंती आहे की त्यांचे कार्य त्यांनी असेच चालू ठेवावे." सिंह यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या पत्रात केंद्राला सीमेवरील घुसखोरीवर कारवाई सुरू ठेवण्याची आणि बेकायदा स्थलांतरितांच्या हद्दपारीसाठी, तसेच ड्रग्ज व नार्को दहशतवादाविरुद्धच्या लढाईसाठी धोरण तयार करण्याची विनंती केली होती.बिरेन सिंह सिंह यांनी राज्यातील हिंसाचार ज्या पद्धतीने हाताळला, त्यामुळे त्यांनी भाजपा आमदारांचा पाठिंबा गमावला होता. सिंह यांना त्यांच्या पक्षातूनच विरोधाचा सामना करावा लागत होता. असंतुष्ट आमदारांनी वारंवार आपली नाराजी व्यक्त करत होते. यामुळे पक्षांतर्गत बंडाची शक्यता तयार झाली होती. तसेच सिंह यांच्या कथित लीक झालेल्या ऑडिओ टेपचा मुद्दा देखील चर्चेत होता. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (CFSL) कडून लीक झालेल्या ऑडिओ टेप्सचा अहवालदेखील मागवला आहे; ज्यामध्ये राज्यातील चालू असलेल्या वांशिक हिंसाचारात बिरेन सिंह यांचा कथित सहभाग असल्याचे सांगण्यात आले आहे. कुकी ऑर्गनायझेशन फॉर ह्युमन राइट्स ट्रस्टने दाखल केलेल्या रिट याचिकेच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे; ज्यामध्ये २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

### हजारो लोक विस्थापित

मणिपूरमधील हिंसाचारात जवळपास ३०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक विस्थापित देखील झाले आहेत. मणिपूरमध्ये मे २०२३ पासून मेतेई आणि कुकी-झो समुदायांमध्ये जातीय संघर्ष सुरू आहे. मणिपूरमध्ये यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) नेतृत्वाखालील सरकार होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये, कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) ने एन. बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर ९ फेब्रुवारी रोजी सिंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

# भाजपा दिल्लीपाठोपाठ बिहारही जिंकणार?

## देशभरात एनडीएला 343 जागा मिळू शकतात, तर भाजपाला 282

। प्रयागराज । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आज निवडणुका झाल्यास देशात काय चित्र दिसून येईल, यासंदर्भात इंडिया टुडे-सी व्होटर यांनी संयुक्तपणे 'मूड ऑफ द नेशन' हा सर्व्हे केला आहे. या सर्व्हेनुसार, या निवडणुका झाल्यास देशभरात एनडीएला ३४३ जागा मिळू शकतात, तर भाजपाला २८२ जागांवर विजय मिळू शकतो. त्याचवेळी काँग्रेसला फक्त ७८ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.**



या पार्श्वभूमीवर या वर्षाच्या शेवटी होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकांकडे सगळ्यांचं लक्ष लागलेलं असताना त्यासंदर्भातही या सर्व्हेच्या निष्कर्षांमधून अंदाज वर्तवण्यात आले आहेत. इंडिया टुडेनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.या सर्व्हेच्या निष्कर्षांवरून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार बिहारमध्ये आत्ता विधानसभा निवडणुका झाल्यास भाजपाप्रणीत एनडीएला मोठा विजय मिळू शकतो.इंडिया टुडे-सी व्होटरनं मांडलेल्या निष्कर्षांनुसार एनडीएला बिहारमध्ये ४० जागांपैकी ३३ ते ३५ जागांवर विजय मिळू शकतो. त्याचवेळी दुसरीकडे काँग्रेस व राष्ट्रीय जनता दल यांच्या महागठबंधन आघाडीला मोठा धक्का बसण्याचा अंदाज आहे. विरोधकांच्या आघाडीला अवघ्या ५ ते ७ जागा मिळतील, असा अंदाज या निष्कर्षांवरून काढण्यात आला आहे.दरम्यान, एनडीएला मिळू शकणाऱ्या मतांच्या टक्क्यांमध्येही वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यानुसार, एनडीएला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बिहारमध्ये मिळालेल्या ४७ टक्के मतांवरून एनडीएच्या मतांची टक्केवारी थेट ५२ टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

### एनडीएच्या मतटक्क्यांमध्येही वाढ

दुसरीकडे महागठबंधनला मिळालेल्या मतांचा आकडाही ३९ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांवर जाऊ शकतो, असा अंदाज या सर्व्हेतून मांडण्यात आला आहे. हा सर्व्हे २ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या काळात घेण्यात आला होता. यात देशभरातील लोकसभा मतदारसंघांमधून १ लाख २५ हजार १२३ मतदारांनी सहभाग घेतला होता.एनडीएतील पक्ष बिहार विधानसभा निवडणुकीत एकत्र राहिले, तर एनडीएला पराभूत करणं अवघड ठरेल, असा अंदाज सी व्होटरचे संस्थापक यशवंत देशमुख यांनी वर्तवला आहे.

# स्पृहा जोशीने केलं रसिकाचे कौतुक!



सूर नवा ध्यास नवा हा कार्यक्रम नुकताच नव्या ढंगात सुरु झाला. यंदाची थीम नव्या नवलाईवर आधारित आहे. पण सोबतच त्यात नवा बदलही झाला. तो म्हणजे यावेळी शोमध्ये स्पृहा जोशी ऐवजी अभिनेत्री रसिका सुनील सूत्रसंचालकाची भूमिका पार पाडत आहे. ढोलकीच्या तालावर या शोच्या महाअंतिम सोहळ्यात रसिकाने हे सरप्राइज उघड केले आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. गेले अनेक सीझन या शोच्या सूत्रसंचालकाची धूरा स्पृहा जोशीच सांभाळत असल्यामुळे अनेकांसाठी ही बातमी अनपेक्षित होती. गेले काही दिवस रसिकाची सतत स्पृहासोबत तुलना केली जात होती. त्यामुळे तिने, " मला एकदा तरी स्पृहाशी बोलावेच लागेल, सुरुवातीला मी खूप खुश होते पण लोकांचा आताचा स्पृहासाठीचा प्रतिसाद पाहता तिच्याशी बोलणे गरजेचे आहे. मला तिच्याकडून खूप काही शिकून घ्यायचे आहे असे ती म्हणाली होती. आता स्पृहाने रसिकाच्या सूत्रसंचालनावर आपले मत व्यक्त केले आहे. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत स्पृहा म्हणाली की, "एखाद्या गोष्टीत बदल झाला की सगळेच त्या जुन्या गोष्टीला मिस करू लागतात. पण, प्रत्येक नव्या गोष्टीला वेळ द्यायला हवा. पहिल्याच झटक्यात कुणालाच काही सापडत नाही, एखादी गोष्ट हातात यायला प्रत्येकाला वेळ लागतो. माझी खात्री आहे की ती गोष्ट रसिकाच्या पटकन हातात येईल. रसिका उत्तम गायिका आहे. तिने गाणं शिकलं आहे. तसंच तिच्यासाठी सूत्रसंचालन फार अवघड नसेल, ती हे काम उत्तम करेल. रसिकाने सांगितल्याप्रमाणे तिने स्पृहाशी संवाद साधला होता. यावरही तिने प्रतिक्रिया दिली, ती म्हणाली की, "रसिकाने मला फार सुंदर मेसेज केला होता.

# 'पारू'मध्ये खलनायिकेची रि-एन्ट्री!

'पारू' मालिकेचा महासंगम नुकताच पार पडला. यामध्ये आदित्य आणि अनुष्काचा भव्यदिव्य साखरपुडा प्रेक्षकांना पाहायला मिळाला. महासंगमनंतर 'पारू' मालिकेत दररोज काही ना काही घडामोडी घडताना दिसत आहेत.

नुकतंच या मालिकेला १ वर्ष पूर्ण झालं, यानिमित्ताने मालिकेच्या सेटवर सेलिब्रेशन करण्यात आलं आणि सेलिब्रेशनचं अजून एक कारण होत ते म्हणजे घराघरांत लोकप्रिय झालेली आपली लाडकी 'पारू' आता महाराष्ट्राची मॉडेल होणार आहे. 'पारू' पुन्हा एकदा 'किर्लोस्कर ग्रुप ऑफ कंपनीज'ची ब्रँड अँबॅसेडर होणार आहे. अनुष्का पारूला म्हणते, "किर्लोस्कर कंपनी लवकरत पाण्यात बुडणारे..." पारू धाडसाने अनुष्काला सामोरी जाते आणि तिला सडेतोड उत्तर देत म्हणते, "पंधरा दिवसांच्या आत मी तुला किर्लोस्करांच्या घरातून बाहेर फेकून देईन." यामुळे या दोघींच्या शत्रुत्वाला आणखी धार येणार आहे. पारू थेट अनुष्काला आव्हान देते.

आता अनुष्का पारू आणि आदित्यच्या नात्यातली माहिती गोळा करू लागते. पारूविरुद्ध काहीतरी सबळ पुरावा मिळवण्याचा प्रयत्न करते.तर, दुसरीकडे दिशाची मालिकेत रि-एन्ट्री होणार आहे. ती किर्लोस्कर उद्योगसमूहाविरुद्ध प्रतिस्पर्धी कंपनी सुरू करते, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायाला मोठा धोका निर्माण होतो. अहिल्या चिंतेत आणि विचारात आहे की आदित्य या कठीण स्पर्धेला कसा सामोरा जाईल. त्या एका मॅगझिनचं कव्हर पेज पाहतात आणि कुटुंबीयांना म्हणतात, "याला काय अर्थ आहे? एका वेगळ्याच कंपनीची जाहिरात मॅगझिनच्या कव्हरवर छापून आलीये आणि आपल्या कंपनीच्या जाहिरात बॅक-कव्हरवर छापलीये."पारूला पुन्हा एकदा दिमाखात किर्लोस्कर कंपनीची ब्रँड अँबॅसेडर बनवण्यासाठी एक कार्यक्रमाचं आयोजन केलं गेलं आहे. अनुष्काचा खरा चेहरा आता पारू सर्वांसमोर आणणार आहे.




# अंकिताच्या हातावर सजली मेहंदी!

अंकिता वालावलकरच्या घरी गेल्या काही दिवसांपासून लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस मराठी'चा महाअंतिम सोहळा पार पडल्यावर अंकिताने ती लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याचं जाहीर केलं होतं. अखेर दसऱ्याच्या मुहूर्तावर अंकिताने तिच्या होणाऱ्या नवऱ्याचा चेहरा सर्वांसमोर रिव्हिल केला होता. जानेवारी महिन्यात लग्नपत्रिकेची लहानशी झलक शेअर करत अंकिताने, लवकरच ती आयुष्याची एक नवीन सुरुवात करणार असल्याचं आपल्या चाहत्यांना सांगितलं होतं. आता अंकिता लग्नसोहळ्यासाठी आपल्या गावी पोहोचली आहे. अंकिता व कुणाल यांचा लग्नसोहळा कोकणात देवबाग येथे पार पडणार आहे. यासाठी अंकिताच्या सासरचे लोक, जवळचे मित्रमंडळी आणि काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स सुद्धा कोकणात पोहोचले आहेत. अंकितासह तिच्या होणाऱ्या नवऱ्याचं तिच्या कुटुंबीयांनी मोठ्या प्रेमाने स्वागत केल्याचं पाहायला मिळालं. आता अंकिताला कुणालच्या नावाची मेहंदी लागली आहे.'कोकण हार्टेड गर्ल'च्या घरी लग्नाआधीच्या विधींना सुरुवात झाली असून, अंकिता व कुणालचा मेहंदीसोहळा नुकताच पार पडला आहे.



# मुंबई मेट्रोत दिसला हृतिक

बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन हा नेहमी चर्चेत असतो. तो त्याच्या चित्रपटांमुळे कमी अन् वैयक्तिक आयुष्यामुळे लाईमलाइटमध्ये राहतो. हृतिक त्याच्या दमदार अभिनयासाठी प्रसिद्ध आहे. हृतिक रोशन सध्या त्याच्या आगामी 'फायटर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हृतिकचे चाहते देखील या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान हृतिकचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. या व्हायरल व्हिडिओत हृतिक मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करताना दिसत आहे.



# या गायिकांची हैराण करणारी कोटींची कमाई







हिंदी किंवा मराठी कोणत्याही भाषेतील सिनेमा हा गाण्यांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गायका - गायिकांना सिनेमातील कलाकारांइतकाच दर्जा आहे. गायक सिनेमातील गाण्यांशिवाय स्वत:चे स्टेज शो करतात. सिनेसृष्टीतील अनेक गायकांनी आपल्या आवाजाने, गाण्यांनी मोठी लोकप्रियता मिळवली आहे. सध्याच्या काळात अनेक महिला गायिका आपले स्वत:चे सिंगिंग शो करतात. त्यांचे स्वत:चे बँडदेखील आहेत. याद्वारे त्यांची मोठी कमाईदेखील होते. सुनिधि चौहानने तिच्या गाण्यांनी बॉलिवूडमध्ये एक काळ गाजवला.रिपोर्ट्सनुसार, सुनिधि एका गाण्यासाठी १२ ते १६ लाख रुपये चार्ज करते. तिची एकूण संपत्ती १०० कोटी रुपये आहे. अलका याग्निक यांची गाणी तुफान गाजली. त्या एका बॉलिवूड गाण्यासाठी १२ लाख रुपये घेतात. अलका याग्निक यांचं नेट वर्थ जवळपास ६० कोटी रुपये आहे.

# शाहीनला ठोठावला दंड!

## आफ्रिदी मॅथ्यू ब्रीट्झकेशी घातला वाद




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पाकिस्तान क्रिकेट संघातील तीन खेळाडूंवर आयसीसीने मोठी कारवाई केली आहे. तिरंगी मालिकेत १२ फेब्रुवारी रोजी पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना खेळवण्यात आला. या सामन्यात आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल १ चे उल्लंघन केल्याबद्दल तीन खेळाडूंना दंड ठोठावण्यात आला आहे. या तीन खेळाडूंमध्ये शाहीन आफ्रिदी, सौद शकील आणि कामरान गुलाम यांचा समावेश आहे.**

वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीला संहितेच्या कलम २.१२ चे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. याशिवाय, कामरान गुलाम आणि सौद शकील यांना संहितेच्या कलम २.५ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळले आहे. दोघांकडूनही मॅच फीच्या १० टक्के रक्कम कापण्यात आली आहे.पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या गेलेल्या तिरंगी मालिकेतील तिसऱ्या सामन्याच्या २८ व्या षटकात शाहीन आफ्रिदी आणि मॅथ्यू ब्रिट्झके यांच्यात जोरदार वाद झाला. आफ्रिदीचा संयम सुटला आणि तो मॅथ्यूशी वाद घालायला गेला. यानंतर, पुढच्या चेंडूवर, जेव्हा मॅथ्यू ब्रीट्झके एक धाव घेत होता. तेव्हा या काळात आफ्रिदीने त्याला मुद्धाम अडवण्याचा प्रयत्न केला होता. दोन्ही खेळाडूंमध्ये शारीरिक संपर्क आणि जोरदार वाद झाला.

यानंतर, २९ व्या षटकात टेम्बा बावुमा धावचीत झाला.

दरम्यान, कामरान गुलाम

आणि सौद शकील हे आनंद साजरा करण्यासाठी बावुमाजवळ पोहोचले. दोन्ही खेळाडूंनी बावुमाला जवळून स्लेज मारण्याचा प्रयत्न केला. तथापि, बावुमाने खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले आणि शांतपणे पॅव्हेलियनमध्ये परतला. आफ्रिदी, गुलाम आणि शकील यांच्या खात्यात प्रत्येकी एक डिमेरिट पॉइंट जोडण्यात आला आहे.

गेल्या २४ महिन्यांत या खेळाडूंनी केलेला हा पहिलाच मैदानावरील गुन्हा आहे. सर्व खेळाडूंनी सुनावलेल्या शिक्षेचा स्वीकार केला आहे. या प्रकरणात आता कोणतीही औपचारिक सुनावणी होणार नाही. १२ फेब्रुवारी रोजी खेळल्या गेलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३५२

धावा केल्या, ज्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने मोहम्मद रिझवानच्या नाबाद १२२ धावांच्या आणि सलमान आघाच्या १३४ धावांच्या जोरावर ४९ षटकांत ६ गडी राखून सामना जिंकला.पाकिस्तान क्रिकेट संघातील तीन खेळाडूंवर आयसीसीने मोठी कारवाई केली आहे. तिरंगी मालिकेत

# डब्ल्यूपीएलचा तिसरा हंगाम आजपासून



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) चे पहिले दोन हंगाम यशस्वीरित्या पार पडल्यानंतर, आता तिसरा हंगाम १४ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. ज्यामध्ये यावेळी देशातील चार शहरांमध्ये स्पर्धेचे सामने खेळवले जातील. डब्ल्यूपीएलमध्ये एकूण ५ संघ सहभागी होतात. या स्पर्धेतील सामने कधी, कुठे आणि केव्हा खेळले जाणार आहेत, त्याचबरोबर लाईव्ह स्ट्रीमिंग कुठे पाहता येणार? याबद्दल जाणून घेऊया. डब्ल्यूपीएलच्या पहिल्या हंगामात, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स संघाने या स्पर्धेची ट्रॉफी जिंकली होती, तर दुसऱ्या म्हणजेच गेल्या हंगामात, स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाने जेतेपद जिंकण्यात यश मिळवले होते. यावेळी, डब्ल्यूपीएल २०२५ चा पहिला सामना १४ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना १५ मार्च रोजी खेळला जाईल.महिला प्रीमियर लीग २०२५ चे सामने देशातील चार शहरांमध्ये खेळवले जातील, हे पहिल्यांदाच घडणार आहे. या स्पर्धेचा पहिला टप्पा वडोदरा येथे सुरूवात होणार आहे. त्यानंतर दुसरा टप्पा बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल.

# अनेक वर्षांपासून जबाबदारी पार पाडली!

## पाटीदार कर्णधार होताच विराटने दिली प्रतिक्रिया

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२५ साठी रजत पाटीदारची नवीन कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. यापूर्वी चाहत्यांना वाटत होते की विराट कोहली पुन्हा एकदा आरसीबीचा कर्णधार होऊ शकतो, पण फ्रँचायझीने रजतला नवीन कर्णधार बनवून चाहत्यांना आश्चर्यचकित केले आहे. त्याचवेळी, रजत पाटीदार आरसीबीचा नवा कर्णधार झाल्यानंतर विराट कोहलीची प्रतिक्रिया समोर आली आहे. विराटने एक व्हिडिओ जारी करून रजतचे अभिनंदन केले आहे.**

विराट कोहली म्हणाला की, मध्य प्रदेश संघाची जबाबदारी स्वीकारून पाटीदारने सिद्ध केले आहे की तो संघाचे नेतृत्व करू शकतो. त्याने आरसीबी चाहत्यांना आगामी हंगामात त्याला पाठिंबा देण्याचे आवाहनही केले. रजत पाटीदार सुरुवातीपासूनच कर्णधार होण्याच्या शर्यतीत होता. पाटीदार हा त्या निवडक खेळाडूंपैकी एक आहेत ज्यांना फ्रँचायझीने आगामी हंगामासाठी कायम ठेवले आहे. पाटीदारकडे सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये मध्य प्रदेशचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे.आरसीबीने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर कोहलीचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये विराट कोहली म्हणाला, “सर्वप्रथम मी पाटीदारचे अभिनंदन करू इच्छितो आणि सांगू इच्छितो की, ज्या पद्धतीने तू फ्रँचायझीमध्ये प्रगती केली आहेस आणि कामगिरी केली आहेस. त्यामुळे तू आरसीबी चाहत्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. सर्व तुला नेतृत्व करताना पाहण्यासाठी उत्सुक आहेत. त्याचबरोबर मी आणि संघातील प्रत्येक सदस्य तुमच्यासोबत उभा राहील आणि तुला पाठिंबा देऊ.”कोहली पुढे म्हणाला, “ही एक मोठी जबाबदारी आहे आणि मी ही जबाबदारी अनेक वर्षांपासून पार पाडली आहे. गेल्या काही वर्षांत फाफ डु प्लेसिसने ही जबाबदारी पार पाडली होता. मला खात्री आहे की हा तुझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे आणि मी तुझ्यासाठी खूप आनंदी आहे. मी पाटीदारला एक खेळाडू म्हणून उदयास येताना पाहिले आहे. त्याला भारताकडून खेळण्याची संधी मिळाली आहे. गेल्या काही वर्षांत त्याचा खेळ अनेक पातळ्यांवर सुधारला आहे. त्याने ज्या पद्धतीने त्याच्या राज्य संघाचे नेतृत्व केले आहे, त्यावरून त्याने दाखवून दिले आहे की तो या फ्रँचायझीचे नेतृत्व करण्यास पात्र आहे.”विराट कोहली, भुवनेश्वर कुमार, कृणाल पंड्या, रजत पाटीदार (कर्णधार), यश दयाल, लियाम लिव्हिंगस्टोन, फिल साल्ट, जितेश शर्मा, जोश हेझलवूड, रसिक दार, स्वप्नील सिंग, टिम डेव्हिड, मनोज भंडागे, जेकब बेथेल, देवदत्त पडिकल, स्वस्तिक चिकारा, लुंगी एनगिडी, अभिनंदन सिंग, मोहित राठी, रोमारियो शेफर्ड, सुयश शर्मा.



## ग्लोबल मार्केटच्या दृष्टीने विचार केल्यास

# उद्योजकांना अनेक संधी: विनोद जाधव

### शिक्षण विश्व; सावा हेल्थकेअरचे विनोद जाधव यांना पीसीईटी कडून लिव्हिंग लिजेंड अवॉर्ड

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**”शिक्षण आणि जिज्ञासा ही सदासर्वकाळ माणसाच्या सोबत असते. आपण जिथे शिक्षण घेतो अथवा काम करतो तिथे आपली जिज्ञासा कायम ठेवली तर , कोणतीही गोष्ट अशक्य नाही . ग्लोबल मार्केटचा विचार करून , जगभरात विविध संधी उद्योजकांची वाट पाहत आहेत , उद्योजकांनी जगभरात उपलब्ध असलेल्या संधींकडे उघड्या डोळयांनी पाहत आपला उत्कर्ष साधून घ्यायला हवा.असे मत सावा हेल्थकेअर , दुबईचे सर्वेसर्वा विनोद जाधव यांनी केले.**






ग्लोबल आंत्रप्रेन्योर्स कॉन्क्लेव्ह २०२५ च्या यशोगाथा या कार्यक्रमाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या आकुर्डी येथील शैक्षणिक संकुलात ते बोलत होते. एमईडीसीचे उपाध्यक्ष , पीसीयू गवर्निंग बॉडीचे सदस्य आणि ग्लोबल आंत्रप्रेन्योर्स कॉन्क्लेव्ह 2025 चे निमंत्रक सचिन इटकर यांनी विनोद जाधव यांच्याशी अनौपचारिक चर्चेद्वारे खुला संवाद साधला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्लोबल आंत्रप्रेन्योर्स कॉन्क्लेव्ह २०२५ चे अध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी प्रास्ताविकात पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टची यशस्वी वाटचाल मांडली व तसेच नुकत्याच यशस्वीरित्या पार पडलेल्या भव्य ग्लोबल आंत्रप्रेन्योर्स कॉन्क्लेव्ह २०२५ चा आढावा घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून ग्लोबल फार्मसी मार्केट, आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक कायदे यांच्याबद्दल जाणून घेतले.

### परिषदेसाठी मान्यवरांची उपस्थिती...

या परिषदेसाठी पोर्टफोलिओचे माजी संचालक डॉ. मकरंद जावडेकर यांनी जगभरातील फार्मसी सेक्टर , औषधे विपणन याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. मकरंद जावडेकर यांच्या हस्ते विनोद जाधव यांना पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचा लिव्हिंग लिजेंड अवॉर्ड प्रदान करण्यात आला. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे , अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई उपस्थित होते.

---

# इंद्रायणी थडी होणारच.. पण, प्रतीक्षा आणखी काही दिवसांची..!

### इंद्रायणी थडी आणखी काही दिवस लांबणीवर : शिवांजली सखी मंच व संयोजकांची माहिती

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून शिवांजली सखी मंचच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारा आणि महाराष्ट्रभरातील महिला भगिनींसाठी आकर्षणाचाच केंद्रबिंदू असणारा इंद्रायणी थडी महोत्सव या वर्षीही २७ फेब्रुवारी ते २ मार्च या चार दिवसांदरम्यान आयोजित करण्यात आला होता. पण, काही कारणांमुळे इंद्रायणी थडी महोत्सवाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत आयोजकांकडून अधिकृत पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे.**




> “ देव-देश अन् धर्म आणि शेती-माती-संस्कृतीचा पुरस्कार आणि स्त्रीशक्तीचा सन्मान या संकल्पनेतून होणारा इंद्रायणी थडी महोत्सव काही दिवस पुढे ढकलण्यात येत आहे. महिला बचत गट आणि विविध उपक्रम, कार्यक्रम यांचे संयोजक यांनी नोंदणी केलेले स्टॉल व कार्यक्रम याचे नियोजन ‘जैसे थे’ राहील. नवीन वेळाप्रत्रक निश्चित झाल्यानंतर सर्वानाच याबाबत पूर्वसूचना दिली जाईल. आपण सर्वजण मिळून निश्चितपणे इंद्रायणी थडी अगदी थाटात साजरी करण्यात येणार आहे.
>
> **–मुक्ता गोसावी,** समन्वयक, इंद्रायणी थडी महोत्सव.

अवघ्या महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या उद्योजकता विकासासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या इंद्रायणी थडी महोत्सवाची वर्षभर आपुलकीने प्रतिक्षा असते. यावर्षी विधानसभा निवडणूक आचारसंहिता, निवडणूक निकाल आणि त्यांनरच्या काळातील राजकीय-सामाजिक घडामोडी यामुळे इंद्रायणी थडीचे आयोजन करण्यास विलंब झाला, त्यातच २७ फेब्रुवारी ते २ मार्च या चार दिवसांदरम्यान आयोजित व जाहीर करण्यात आलेला हा महोत्सव आणखी काही दिवस लांबणीवर पडणार आहे.

आयोजक आमदार महेश लांडगे व शिवांजली सखी मंच च्या वतीने प्रसिद्ध कारण्यात आलेल्या पत्रकाद्वारे सांगितले आहे की, इंद्रायणी थडीची तयारी शिवांजली संखी मंच आणि सर्वच सहकाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सुरू केली होती. स्टॉल वाटप, विविध कार्यक्रमाची रुपरेषा अगदी अंतिम टप्प्यात होती. पण, सध्या इयत्ता १२ वीच्या परीक्षा सुरू आहेत. ज्या ठिकाणी इंद्रायणी थडी भरवण्यात येत आहे. या परिसरात 20 ते 25 मोठ्या शाळा आहेत. या ठिकाणी परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थांना व पालकांची गैरसोय होणार आहे. वाहतूक नियोजन आणि नियंत्रण हा मुद्दाही महत्त्वाचा आहे. याबाबत शिक्षण संस्था प्रशासनाकडून तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली. राज्य सरकारने ‘कॉपीमुक्त महाराष्ट्र’ अभियान सुरू केले आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाला अडचण होणार नाही, याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे. तसेच, मोशी आणि चऱ्होली गावातील ग्रामदैवतांचा उत्सव होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी एकाच आठवड्यात तीन जत्रा होतील. त्यामुळे स्थानिक नागरिकांना सहभागी होता येणार नाही, असाही एक विचार पुढे आला. दरम्यान, श्रीक्षेत्र अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास आणि प्रखर हिंदूत्ववादी कीर्तनकार ह.भ.प. शिरीष महाराज मोरे यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यामुळे अध्यात्मिक आणि वारकरी सांप्रदायातून शोक व्यक्त होत आहे. अशावेळी या महोत्सवाचे आयोजन योग्य ठरणार नाही.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# पिंपरी-चिंचवडमधील ४३८ मालमत्तांवर टाच!

## महापालिका प्रशसानाची माहिती : मालमत्ताधारकांकडे 17 कोटी 38 लाख 94 हजाराची थकबाकी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

**महापालिकेने ५० हजारांपुढील थकबाकीदारांच्या औद्योगिक, निवासी, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ४३८ मालमत्तांवर पिंपरी चिंचवड महापालिकेने टाच आणली आहे. या मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. या मालमत्ताधारकांकडे १७ कोटी ३८ लाख ९४ हजार रूपयांची थकबाकी आहे.**



कर संकलन विभागाने थकबाकीदारांच्या मालमत्ता लाखबंद करून जप्त केल्या आहेत. त्यानंतरही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. एकूण ४३८ मालमत्तांची यादी कर संकलन विभागाने प्रसिद्ध केली आहे. त्यात बिगर निवासी ३००, निवासी ७६, मिश्र ४६, औद्योगिक १३, तीन मोकळ्या जमिनी अशा मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांकडे ५० हजार ते ६३ लाखांपर्यंतची थकबाकी आहे. त्यात नामांकित बांधकाम व्यावसायिक, संस्था, व्यक्ती यांच्या शहराच्या विविध भागातील मालमत्ता आहेत. महापालिकेने ५० हजारांपुढील थकबाकीदारांच्या औद्योगिक, निवासी, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ४३८ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे.

### 25 फेब्रुवारीपर्यंत शेवटची मुदत...

थकबाकीदार मालमत्ताधारकांना कर भरण्याची शेवटची मुदत २५ फेब्रुवारी देण्यात आली आहे. त्यानंतर लिलाव प्रक्रियेला सुरूवात करण्यात येणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी २५ फेब्रुवारीपर्यंत कर भरून मालमत्तेचा लिलाव टाळावा, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.